बायबलप्रमाणे ख्रिस्ती म्हणजे काय?

लेखक: अ‍ॅल्बर्ट एन मार्टिन

अनुवाद: क्रॉसी उर्टेकर

अनुक्रमणिका

प्रस्तावना ४

१. वैयक्तिक पाप ४
अ. दृष्टिक्षेप ४
ब. वाईट नोंदी ५
क. वाईट अंत:करण ७

२. पापावर दैवी उपाय ८
अ. व्यक्तीमध्ये ९
ब. वधस्तंभात केंद्रित १०
क. सर्व मानवांस देऊ केलेले १२

३. बायबलप्रमाणे ख्रिस्ती १३
अ पश्चात्ताप १४
ब विश्वास १६
क सतत एकत्र १७

४. बायबलप्रमाणे ख्रिस्ती असल्याचा पुरावा १७
मनन व चर्चेसाठी प्रश्न २१

बायबलप्रमाणे ख्रिस्ती म्हणजे काय?

अनुवाद: क्रॉसी उर्टेकर

पहिली मराठी आवृत्ती: २०१७

© Copyright 1998 Chapel Library. Printed in the USA. Permission is expressly granted to reproduce this material by any means, provided

1. You do not charge beyond a nominal sum for cost of duplication;
2. This copyright notice and all the text on this page are included.

Chapel Library is a faith ministry that relies entirely upon God's faithfulness. We therefore do not solicit donations, but we gratefully receive support from those who freely desire to give. Chapel Library does not necessarily agree with all the doctrinal positions of the authors it publishes.

Worldwide, please download material without charge from our website, or contact the international distributor as listed there for your country. In North America, for additional copies of this booklet or other Christ-centered materials from prior centuries, please contact

CHAPEL LIBRARY

2603 West Wright Street Pensacola, Florida 32505 USA

Phone: (850) 438-6666 • Fax: (850) 438-0227

chapel@mountzion.org *www.ChapelLibrary.org*

Translated and Published by Love Maharashtra with permission from Chapel Library USA

लव्ह महाराष्ट्र

१७७२ भीमपुरा गल्ली क्र. २३, बाबाजान चौक, पुणे – ४११००१. महाराष्ट्र

दुरध्वनी: ०२०-२६३४०५५३

ईमेल: lovemaharashtra@gmail.com

वेबसाईट: lovemaharashtra.org

बायबलप्रमाणे ख्रिस्ती म्हणजे काय?

प्रस्तावना
असे पुष्कळ विषय आहेत की त्यांच्या संदर्भात पूर्ण अज्ञान असले आणि अगदी तटस्थता दर्शवली तरी ते खेदजनक किंवा घातक ठरू शकत नाहीत. मला खात्री आहे की आपल्यापैकी थोडके लोकच तपकिरी गाय हिरवे गवत खाते आणि पांढरे दूध कशी देते याची प्रक्रिया सांगू शकत असले तरीही आपल्या सर्वांना दुधाचा आस्वाद आवडतो. आईनस्टाईनच्या सापेक्षतेच्या सिद्धांताविषयी आपल्यापैकी पुष्कळ जण अज्ञान आहेत आणि तो समजून सांगण्यासाठी आपल्याला कितीही भरीस पाडले तरी आपण तो सांगू शकणार नाही. आपण त्या सिद्धांताविषयी केवळ अज्ञान आहोत एवढेच नव्हे तर बहुतेक लोक तटस्थही आहेत. तरीही आपले हे अज्ञान किंवा तटस्थ असणे आपल्यासाठी खेदजनक किंवा प्राणघातकही ठरू शकत नाही. मात्र काही विषयासंदर्भात आपण अज्ञान असणे किंवा तटस्थ असणे आपल्यासाठी खेदजनक किंवा प्राणघातकही ठरू शकते.

हीच गोष्ट एका प्रश्नाच्या उत्तराविषयी आहे. तो प्रश्न आहे, "बायबलप्रमाणे ख्रिस्ती म्हणजे काय?" दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, एखादा पुरुष, स्त्री, मुलगा, मुलगी यांना ख्रिस्ती म्हणवण्याचा हक्क केव्हा प्राप्त होतो? हा किंवा ती व्यक्ती ख्रिस्ती आहे असा कोणी अंदाज व्यक्त करू नये. या मुद्द्यावरचा खोटा निष्कर्ष खेदजनक किंवा प्राणघातकही ठरू शकतो. “बायबलप्रमाणे ख्रिस्ती कोण?" या प्रश्नाच्या उत्तराची चार सूत्रे मी तुमच्या समोर ठेऊ इच्छितो.

१. वैयक्तिक पाप

अ. दृष्टिक्षेप

बायबलनुसार ख्रिस्ती व्यक्ती म्हणजे जिने आपल्या वैयक्तिक पापाच्या समस्येला वास्तवात तोंड दिलेले असते.

ख्रिस्ती विश्वास व जगातील इतर धर्मांमधील अनेक भेदांपैकी एक भेद हा आहे की ख्रिस्ती धर्म मूलत: खरोखर पाप्यांचा धर्म आहे. येशूच्या जन्मापूर्वी जेव्हा देवदूताने योसेफाला दर्शन दिले तेव्हा त्याने म्हटले. "ती पुत्र प्रसवेल, आणि तू त्याचे नाव येशू ठेव. कारण तोच आपल्या लोकांस

त्यांच्या पापांपासून तारील" (मत्तय १:२१). प्रेषित पौल १ तीमथ्य १:१५ मध्ये म्हणतो, "ख्रिस्त येशू पापी लोकांस तारावयास जगात आला, हे वचन विश्वसनीय व सर्वथा स्वीकारावयास योग्य आहे; त्या पापी लोकांपैकी मी मुख्य आहे." येशू स्वत: लूक ५:३१,३२ मध्ये म्हणतो, "निरोग्यांस वैद्याची गरज नाही तर दुखणाइतांस आहे. मी धार्मिकांस नाही तर पापिष्टांस पश्चात्तापासाठी बोलविण्यास आलो आहे." ख्रिस्ती व्यक्ती म्हणजे जिने खऱ्या अर्थाने आपल्या वैयक्तिक पापाच्या समस्येशी सामना केला आहे.

जेव्हा आपण देवाच्या वचनाकडे वळतो तेव्हा आपल्याला आढळते की पापासंदर्भात आपणा प्रत्येकाला दुहेरी वैयक्तिक समस्या आहे. एका बाजूला आपल्या नोंदी वाईट आहेत तर दुसऱ्या बाजूला समस्या आहे की आपले अंत:करण वाईट आहे. आपण उत्पत्ती तिसऱ्या अध्यायापासून सुरुवात केली तर देवाविरुद्ध मानवाने केलेल्या बंडखोरीची आणि त्याच्या पापातील पतनाची नोंद सापडते. मग तेथून पुढे पापाविषयीचा बायबलचा सिद्धांत थेट प्रकटीकरणापर्यंत पाहायला मिळतो. अगदी सोप्या भाषेत सांगायचे तर पापाच्या सिद्धांताविषयी बायबल जे काही सांगते त्याचे दोन मूलभूत मुद्द्यांमध्ये वर्गीकरण करता येईल: वाईट नोंदींची समस्या आणि वाईट अंत:करणाची समस्या.

ब. वाईट नोंदी

"वाईट नोंदींची समस्या" असे म्हणताना मला नेमके काय म्हणायचे आहे? पापामुळे मनुष्याच्या ठायी अपराधी भावना असते हा जो सिद्धांत बायबल आपल्यासमोर ठेवते, त्याचे वर्णन करण्यासाठी मी ही परिभाषा वापरतो. बायबल स्पष्ट सांगते की या भूतलावर आपण व्यक्ती म्हणून येण्याच्या बराच काळ आधीपासून आपल्या वाईट नोंदी आहेत. ‘‘एका मनुष्याच्याद्वारे पाप जगात आले आणि पापाच्याद्वारे मरण आले; आणि सर्वांनी पाप केल्यावरून सर्व मनुष्यांत मरण पसरले" (रोम. ५:१२).

केव्हा "सर्वांनी" पाप केले? आपण सर्वांनी आदामामध्ये पाप केले. संपूर्ण मानवजातीसाठी प्रतिनिधी म्हणून देवाने आदामाला नेमले होते. जेव्हा त्याने पाप केले तेव्हा त्याच्या ठायी आपण पाप केले. आणि त्याच्या पहिल्या उल्लंघनात आपणही त्याच्यासोबत पतन पावलो. म्हणूनच प्रेषित पौल १ करिंथ १५:२२ मध्ये म्हणतो, "जसे आदामामध्ये सर्व मरतात तसे ख्रिस्तामध्ये सर्व जिवंत केले जातील." एदेन बागेत

देवाने मानवाला पापरहित अवस्थेत निर्माण केले होते; पण ज्या क्षणी आदामाने पाप केले त्याच क्षणी आपल्यालाही गुन्ह्याचा दोष लागला. त्याच्या पहिल्या गुन्ह्यात आपणही त्याच्यासोबत पतन पावलो, आता आपण दोषी मानवजातीचा एक भाग आहोत.

पुढे देवाचे वचन असे शिकवते की आपल्या जन्मानंतर, आपल्या वैयक्तिक गुन्ह्यांमुळे आपल्या अपराधांमध्ये अधिकच भर पडते. देवाचे वचन शिकवते की "सदाचाराने वागणारा व पाप न करणारा असा धार्मिक पुरुष पृथ्वीवर आढळणार नाही" (उपदेशक ७:२०). आणि ओढवून घेतलेले प्रत्येक पाप गुन्ह्यात भरच घालते. स्वर्गातील आपल्या नोंदी कलंकित नोंदी आहेत. सर्वसमर्थ देव संपूर्ण मानवी अनुभव त्याच्या अगदी लवचिक मापनदंडाने मोजतो. हा मापनदंड केवळ आपली बाह्यकृत्येच नव्हे तर आपले विचार, आपल्या अंत:करणाच्या हालचाली — इतक्या बारकाईने मोजतो की अन्यायाने राग चेतवणे खुनाची कृती करण्यासारखे आहे, आणि कामवासनेने पाहणे व्यभिचार केल्यासारखे आहे (मत्तय ५:२२,२८).

देव तपशीलवार नोंदी ठेवतो. त्या नोंदी पुस्तकांत केल्या असून न्यायाच्या दिवशी ती पुस्तके उघडली जातील (प्रकटी. २०:१२). या पुस्तकांमध्ये प्रत्येक विचार, प्रत्येक प्रवृत्ती, प्रत्येक हेतू, प्रत्येक कृती, देवाच्या पवित्र नियमांविरुध्द असलेल्या प्रत्येक मानवी अनुभवाचे मोजमाप, मग त्याच्या मापनदंडास तुम्ही उणे पडला असाल किंवा तो गुन्हाच केला असेल अशा सर्व नोंदी असणार. आपल्या वाईट नोंदी आहेत ही आपली समस्या आहे — त्या नोंदींप्रमाणे आपण अपराधी आहोत. खऱ्या व जिवंत देवाविरुद्ध आपण खरोखर पाप व खरोखरीच गुन्हा केला आहे. म्हणूनच देवाचे वचन सांगते की संपूर्ण मानवजात सर्वसमर्थ देवासमोर गुन्हेगार आहे (रोम. ३:१९).

तुमच्या स्वत:च्या वाईट नोंदी आहेत ही समस्या तुम्हाला ज्वलंत, दडपण आणणारी, वैयक्तिक चिंतेची बाब अशी कधी वाटली का? जेव्हा तुमचा बाप आदाम याने पाप केले तेव्हाच सर्वसमर्थ देवाने तुमचा गुन्हेगार म्हणून न्याय केला हे सत्य कधी तुमच्यासमोर आले का? पूर्ण पावित्र्य, न्याय, शुध्दता आणि नीतिमत्ता यांच्या तुलनेत तुम्ही बोललेल्या एकेक शब्दासाठीही तो तुम्हाला गुन्हेगार ठरवतो हे तुम्हाला समजले का? तुमच्या संपर्कात आलेली प्रत्येक बाब तो जाणतो आणि त्याच्या

पावित्र्याच्या हक्काच्या तुलनेत त्याची तो दखल घेतो. परिपूर्ण सत्याच्या विरुध्द तुम्ही उच्चारलेला प्रत्येक शब्द त्याला ठाऊक आहे. या सर्वांमुळे तुम्ही अगदी हतबल झाल्याने त्या सर्वसमर्थ देवाला त्याच्या सान्निध्यात तुम्हाला बोलावण्याचा अधिकार आहे व तुम्ही त्याच्या नियमाविरुध्द केलेल्या प्रत्येक गुन्ह्यांच्या कृतीचा जाब विचारणे गरजेचे आहे, कारण त्यामुळे तुमचा जीव गुन्हेगार ठरला आहे या जाणीवेने तुम्हाला जाग आली का?

क. वाईट अंत:करण

पण नोंदी वाईट असणे हीच केवळ आपली समस्या नाही. आपली आणखी एक समस्या आहे: आपले अंत:करण वाईट आहे. बायबल सांगते आपण जी कृत्ये करतो त्यामुळे नव्हे तर आपण जे काही आहोत, त्यामुळे ही समस्या उद्भवते. जेव्हा आदामाने पाप केले तेव्हा तो देवासमोर केवळ अपराधी ठरला, एवढेच नव्हे तर स्वभावाने तो दूषित व भ्रष्ट बनला.

ही भ्रष्टता यिर्मया १७:९ मध्ये वर्णन केली आहे. "ऱ्हदय हे सर्वांत कपटी आहे, ते असाध्य रोगाने ग्रस्त आहे, त्याचा भेद कोणास समजतो?" येशू मार्क ७:२१ मध्ये त्याचे वर्णन करतो, "कारण आतून म्हणजे मनुष्याच्या अंत:करणातून दुष्ट विचार निघतात." आणि मग जी विविध पापे कोणत्याही दिवशी कोणत्याही वर्तमानपत्रात दिसतात त्यांची तो यादी देतो — खून, व्यभिचार, दुर्भाषण, गर्व. येशूने म्हटले मानवी हे अंत:करणाच्या दूषित विहिरीच्या कूपनलिकेतून बाहेर पडतात. "समाजाचा दबाव व त्याचा वाईट प्रभाव यातून खून व व्यभिचार, आणि गर्व व चोरी ही बाहेर पडतात" असे त्याने म्हटले नाही. तथाकथित "समाजशास्त्राचे तज्ज्ञ" असे सांगतात. ते म्हणतात: "समाजाची अवस्था" गुन्हेगारी व बंडखोरीला जन्म देते; तर येशू म्हणतो ही मानवी *अंत:करणाच्या* अवस्थेची समस्या आहे.

आपणा प्रत्येकाला देवाच्या वचनात वर्णन केल्याप्रमाणे "कपटी व असाध्य रोगाने ग्रस्त" अंत:करण आहे, तो सर्व प्रकारच्या अधर्माचा झरा आहे. रोम. ८:७ म्हणते, "देहाचे चिंतन हे देवाबरोबर वैर आहे: कारण ते देवाच्या नियमशास्त्राच्या अधीन नाही, आणि त्यांच्याने तसे होववत नाही." पौल असे म्हणत नाही की देहाचे चिंतन, म्हणजे देवाकडून *पुनरुज्जीवित न झालेले* अंत:करण आहे, तर तो म्हणतो की ते खुद्द

देवाशी *वैर आहे:* "देहाचे चिंतन हे देवाबरोबर वैर आहे." प्रत्येक मानवाच्या प्रवृत्तीचा कल जिवंत देवाविरुद्ध आवळलेल्या मनगटाच्या मुठीप्रमाणे आहे. ही वाईट अंत:करणाची आंतरिक समस्या आहे — असे अंत:करण की जे पापावरच प्रेम करते, असे अंत:करण की जे पापाचा झरा आहे, असे अंत:करण की ज्याचे देवाविरुध्द वैर आहे.

तुमच्या वाईट अंत:करणाची समस्या तुम्हाला कधी वैयक्तिक निकडीची चिंता वाटली आहे का? तुम्ही मानवाच्या पापिष्टपणावर विश्वास ठेवता का या प्रश्नाचे उत्तर मी तुम्हाला पुस्तकी *ज्ञानातून* मागत नाही. तुम्ही कदाचित पापी स्वभाव व पापी अंत:करण असते या मताशी सहमत व्हाल. माझा प्रश्न आहे की तुमच्या वाईट नोंदी व तुमचे वाईट अंत:करण हे तुमच्या अंतर्यामातील खोल, निकडीच्या चिंतेचे विषय आहेत असे तुम्हाला कधी वाटले का? पवित्र देवाच्या सान्निध्यात तुमचे अपराध किती भयंकर आहेत, या वास्तवाची तुम्हाला खरोखर तुमच्या अंतर्यामात तुमच्या विवेकभावाला जाणीव झाली आहे का? "सर्वांत कपटी व असाध्य रोगाने ग्रस्त" असलेल्या अंत:करणाची घाणेरडी अवस्था कधी तुमच्या नेत्रांना दिसली का?

बायबलप्रमाणे ख्रिस्ती म्हणजे अशी व्यक्ती की जिने आपल्या स्वत:च्या पापाची ही वैयक्तिक समस्या सर्वस्वी गांभीर्याने आपल्या मनावर घेतली आहे. पापाचे प्रमाण पाहता एका व्यक्तिपेक्षा दुसरीला पापाचा भयानक भार वेगवेगळा जाणवेल. आपल्या वाईट नोंदींची आणि आपल्या वाईट अंत:करणाची जाणीव व्हायला किती काळ लागतो हे सुद्धा व्यक्तिनुसार बदलते. यात बरेच बदल असतात, पण महान वैद्य म्हणून येशूख्रिस्त, ज्याला आपण पापी असल्याची जाणीव झालेली नाही अशा व्यक्तीवर आपल्या रोगनिवारणाचा गुण लादत नाही. त्याने म्हटले, "नीतिमानांना नव्हे तर पापी जनांना बोलावण्यास मी आलो आहे" (मत्तय ९:१३). तुम्ही बायबलप्रमाणे ख्रिस्ती व्यक्ती आहात का जिने आपल्या स्वत:च्या पापाची समस्या गांभीर्याने घेतली आहे?

२. पापावर दैवी उपाय

बायबलप्रमाणे असलेली ख्रिस्ती व्यक्ती अशी आहे की जिने पापावरील दैवी उपाय गांभीर्याने घेतला आहे.

पापी असलेल्या मानवासाठी सर्वसमर्थ देवाने पुढाकार घेतल्याचे बायबल वारंवार सांगते. लहानपणापासून आपण शिकत आलेली वचने पापी मानवाला उपाय उपलब्ध करून देण्यासाठी देवाने पुढाकार घेतल्याचे सांगतात. "देवाने जगावर एवढी प्रीती केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला" (योहान ३:१६). "प्रीती म्हणावी तर हीच; आपण देवावर प्रीती केली असे नाही, तर त्याने तुम्हां आम्हांवर प्रीती केली आणि स्वपुत्राला आपल्या पातकांचे प्रायश्चित्त व्हावे म्हणून पाठवले (१ योहान ४:१०). "तरी देव दयाघन आहे म्हणून आपण आपल्या अपराधांमुळे मृत झालो असताही त्याने आपल्यावरील स्वत:च्या परम प्रेमामुळे ख्रिस्ताबरोबर आपल्याला जिवंत केले" (इफिस २:४), तुमचे तारण कृपेने झाले आहे.

ख्रिस्ती विश्वासाचे असामान्य वैशिष्ट्य हे आहे की ती धार्मिकतेच्या स्वप्रयत्नांची योजना नाही, की जिथे देवाच्या मदतीने तुम्ही कशीबशी ठिगळे लावून दुरुस्ती करता. ख्रिस्ती विश्वासाचे जसे हे असामान्य तत्त्व आहे की ख्रिस्त हाच केवळ पाप्यांचा तारणारा आहे, तसेच ख्रिस्ती विश्वासाचे हे देखील असामान्य तत्त्व आहे की या भूतलावर आपल्याला सर्व सहाय्य वरून प्राप्त होते आणि आपण जेथे आहोत तेथे ते आपली भेट घेते. आपल्या स्वप्रयत्नांच्या कुचक्या बंदांनी आपण स्वत:ला देवाकडे ओढून नेऊ शकत नाही. देवाची दया सर्व अडथळे मोडून मानवाच्या परिस्थितीकडे धावून येते आणि आपण स्वत:साठी जे कधीच करू शकलो नसतो, असे काहीतरी आपल्यासाठी करते.

जेव्हा आपण देवाच्या वचनाकडे वळतो तेव्हा आपल्याला आढळते की देवाच्या दैवी उपायाचे साधेसोपे, सखोल व अद्भुत असे तीन मध्यवर्ती मुद्दे आहेत.

अ. व्यक्तीमध्ये

पहिली गोष्ट म्हणजे पापावरील उपाय एकाच व्यक्तीमध्ये एकत्रित केला आहे. जो कोणी गांभीऱ्याने मानवी पापावरील दैवी उपायावर, गांभीर्याने देवाच्या वचनावर विचार करील, त्याच्या लक्षात येईल की ही उपाययोजना म्हणजे कल्पनांचा एक संच नाही, तसे असते तर ते एक तत्त्वज्ञान ठरले असते. ते कोणत्या संस्थेत सापडत नाही, तर ते एका व्यक्तीत एकवटले आहे. "देवाने जगावर एवढी प्रीती केली की त्याने आपला एकलता एक पुत्र दिला" (योहान ३:१६). "तिला पुत्र होईल,

आणि तू त्याचे नाव येशू ठेव कारण तोच आपल्या लोकांस त्यांच्या पापांपासून तारील" (मत्तय १:२१).

येशू स्वत: म्हणाला, "मार्ग, सत्य व जीवन मीच आहे; माझ्याद्वारे आल्यावाचून पित्याजवळ कोणी जात नाही" (योहान १४:६).

त्यामुळे दैवी उपाय हा एका व्यक्तीत एकवटला आहे, आणि ती व्यक्ती दुसरे तिसरे कोणी नसून येशू ख्रिस्त आहे — हा सनातन शब्द मानव झाला; त्याने खरा मानवी स्वभाव त्याच्या दैवी स्वभावाशी संयुक्त केला. मानवाच्या वाईट नोंदी व वाईट अंत:करणासाठी हीच देवाची तरतूद होय: जो तारणारा देवही आहे आणि मानवही आहे, त्या एका व्यक्तीत सदासर्वकाळासाठी हे दोन स्वभाव संयुक्त केले आहेत. जर बायबलच्या पद्धतीने तुम्हाला आपल्या वैयक्तिक पापाच्या समस्येवर उपाय करायचा आहे तर, तुमचा व्यक्तिगत रीतीने प्रभू येशू ख्रिस्त या व्यक्तीशी व्यवहार झाला पाहिजे. असे हे ख्रिस्ती विश्वासाचे असामान्य सूत्र आहे: आपल्या सर्व गरजांसह पापी व्यक्ती तारणाऱ्याच्या परिपूर्ण कृपेत त्याच्याशी संयुक्त होते; पापी आपली गरज घेऊन उघडानागडा आलेला असतो, आणि हा तारणारा त्याच्या पराक्रमी सामर्थ्याने हजर असतो, असे हे दोघे सुवार्तेमध्ये थेट एकत्र आणले जातात. हे वास्तव पाप्यासाठी देवाच्या सुवार्तेचे गौरव आहे!

ब. वधस्तंभात केंद्रित

दुसरी गोष्ट, पापावरील देवाचा उपाय ज्या वधस्तंभावर येशू ख्रिस्त मरण पावला त्या वधस्तंभात केंद्रित आहे. आपण जेव्हा देवाच्या वचनाकडे वळतो तेव्हा आपल्याला आढळते की असामान्य रीतीने दैवी योजना ख्रिस्ताच्या वधस्तंभात केंद्रित आहे. बाप्तिस्मा करणारा योहान येशूकडे इशारा करताना जुन्या करारातील यज्ञार्पणाच्या कोकऱ्याची उपमा त्याच्यासाठी वापरतो की, "हा पाहा जगाचे पाप हरण करणारा देवाचा कोकरा" (योहान १:२९). येशू स्वत: म्हणाला, "मनुष्याचा पुत्र सेवा करून घ्यावयास नाही, तर सेवा करावयास व बहुतांच्या खंडणीसाठी आपला जीव द्यावयास आला" (मत्तय २०:२८).

सुवार्तेची खरी घोषणा वधस्तंभाशी इतकी केंद्रित आहे की पौल म्हणतो, ते वधस्तंभाचे वचन किंवा संदेश आहे. वधस्तंभाची घोषणा "ज्यांचा नाश होत आहे त्यांच्यासाठी मूर्खपण, तरी ज्यांस तारण प्राप्त होत

आहे अशा आपणांस ते देवाचे सामर्थ्य आहे" (१ करिंथ १:१८). जेव्हा पौल बुध्दिवाद व मूर्तिपूजक ग्रीक तत्त्वज्ञानाचे केन्द्र असलेल्या करिंथात आला, तेव्हा त्याने नेमल्यानुसार प्रचलित असलेली वक्तृत्वाची पद्धत वापरली नाही तर तो म्हणाला की "येशू ख्रिस्त म्हणजे वधस्तंभावर खिळलेला येशू ख्रिस्त; याशिवाय तुम्हांमध्ये दुसरे काही जमेस धरू नये असा मी निश्चय केला" (१ करिंथ २:२).

वधस्तंभाकडे एक गूढ कल्पना म्हणून किंवा एक धर्मचिन्ह म्हणून पाहू नये; वधस्तंभाचा अर्थ आहे की देव जसा त्याचा अर्थ जाहीर करतो तसाच समजून घेणे. वधस्तंभ हे असे स्थान आहे की जेथे देवाने त्याच्या लोकांच्या खात्यावरील पापांच्या ढीगाचा आरोप त्याच्या पुत्रावर लादला. त्या वधस्तंभावर तो आपल्याऐवजी शापवाहक बनला. पौलाच्या भाषेत सांगायचे तर, "ख्रिस्ताने आपणांकरता शापग्रस्त होऊन आपणांला नियमशास्त्राच्या शापापासून खंडणी देऊन सोडवले" (गलती ३;१३). आणि "ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला त्याने (देवपित्याने) तुमच्या आमच्या करता पाप असे केले; यासाठी की आपण त्याच्या ठायी देवाचे नीतिमत्त्व असे व्हावे" (२ करिंथ ५:२१).

वधस्तंभ म्हणजे अस्पष्ट किंवा व्याख्या करता येत नाही अशा स्वत्यागाच्या प्रीतीचे चिन्ह नव्हे; तर उलट देव न्यायी असूनही गुन्हेगार पाप्यांना कशी क्षमा करतो हे दर्शवणारे ते एक स्मारक चिन्ह आहे. वधस्तंभापाशी देव त्याच्या लोकांची पापे ख्रिस्तावर लादून आपल्या लोकांचा प्रतिनिधी म्हणून आपल्या पुत्रावरील न्याय स्पष्ट करतो. तेथे त्या वधस्तंभावर देव मुळीच दयामाया नसलेला त्याच्या क्रोधाचा प्याला त्याचा पुत्र "माझ्या देवा माझ्या देवा माझा त्याग का केलास?" अशी आरोळी करेपर्यंत ओतत राहतो (स्तोत्र २२:१; मत्तय २७:४६).

काल्वरीपाशी अदृष्य, आध्यात्मिक जगात काय घडत आहे याचे दर्शन देव दृश्य जगाला घडवतो. तो आकाश अंधाराने पूर्ण झाकतो व जगाला दाखवून देतो की तुमच्या व माझ्या पापासाठी आपण ज्या शिक्षेला पात्र आहोत ती शिक्षा तो त्याच्या पुत्राला नरकाबाहेरील अंधारात देत असता त्याच्यावर वार करून त्याला ठेचत आहे. येशू त्या वधस्तंभावर गुन्हेगाराच्या अवस्थेत लटकतो; समाजाने त्याच्या बाबतीत एकच निर्णय दिला आहे की, "याची वाट लावा," “याला वधस्तंभी खिळा", "त्याला मरणाच्या स्वाधीन करा"; आणि देव तेव्हा मुळीच हस्तक्षेप

करत नाही. मानवाला दिसणाऱ्या रंगभूमीवर देव प्रदर्शित करत आहे की आम्ही पाहू न शकणाऱ्या प्रांतात देव काय करत आहे. तो आपल्या पुत्राला गुन्हेगाराप्रमाणे वागवत आहे. क्रोधाच्या ज्या भयानकतेला त्याने आपल्यासाठी वाट करून द्यायला हवी होती त्याचा खोल अनुभव तो आपल्या पुत्राला घडवत आहे.

क. सर्व मानवांना देऊ केलेले

तिसरी गोष्ट म्हणजे देवाचा पापावरील उपाय सर्व मानवांसाठी पुरेसा आहे, आणि भेदभाव, पक्षपात न करता सर्व मानवांना हा उपाय तो देऊ करतो. आपल्या पापाविषयी आपल्या विवेकभावाला जाग येण्यापूर्वी, देव पाप्यांना क्षमा करू शकतो असा विचार आपण सहज करू शकतो. पण जसजसे पाप काय आहे याची आपल्याला कल्पना येऊ लागते, तेव्हा आपले हे मत बदलू लागते. आपण कसे धुळीतील कीटकासमान आहोत, आणि ज्या प्राणिमात्रांचे जीवन व श्वास त्या देवाच्या हाती आहे, त्याच्या "ठायी आपण जगतो, वागतो व आहो" (प्रे. कृ. १७:२८), हे आपल्याला दिसू लागते.

आपण हे गांभीर्याने घेऊ लागतो की, देवाविरुद्ध बंड केलेल्या देवदुतांना ज्याने सार्वकालिक अंधकाराच्या हवाली केले त्या देवाविरुद्ध जाण्याचे आपण धारिष्ट केले आहे. मग भ्रष्ट मानवी अंत:करणातून स्फुरलेली किळसवाणी घाण त्या देवाला दिसते हे आपण कबूल करतो. आणि म्हणतो, "हे देवा, तू केवळ न्यायी असताना दुसरा काही कसा असू शकणार? माझ्या पापाच्या पात्रतेनुसार मला काही देऊ केलेस तर क्रोध व न्याय याखेरीज मला देण्यासाठी काहीच नसणार! मला क्षमा करूनही तू न्यायी कसा असू शकतोस? त्या बंडखोर देवदूतांबरोबर मला सार्वकालिक शिक्षेला पाठवण्याऐवजी दुसरे काही करताना तू नीतिमान कसा असू शकतोस?"

जेव्हा आपल्याला आपल्या पापाचे वास्तव समजते तेव्हा क्षमा मागणे ही मोठी हट्टी समस्या होऊन बसते. या समस्येशी आपले अंत:करण सतत झगडत आले आहे. तेव्हाच आपल्याला हे समजणे गरजेचे असते की त्या व्यक्तिमध्ये, त्या वधस्तंभी खिळलेल्या व्यक्तिमध्ये देवाने सर्व मनुष्यांकरता उपायाची पुरेशी तरतूद केली आहे, आणि कसलाही भेदभाव किंवा पक्षपात न करता सर्व मनुष्यांना ती देऊ केली आहे.

ख्रिस्ताच्या उपलब्धतेवर कोणी अटी घालू लागले, तर आपण म्हणावे, "खरोखर मला कोणतीही अट पाळायची नाही आणि मी खरोखर यासाठी अजिबात लायकही नाही." देवाच्या पुरवठ्याविषयी आश्चर्य हे आहे की तो अशा अमर्याद रीतीने आपल्यापर्यंत येतो की: "अहो तान्हेल्यांनो, तुम्ही सर्व जलाशयाकडे या, जवळ पैका नसलेले तुम्ही या; *सौदा करा, खा; या, पैक्यावाचून व मोलावाचून द्राक्षारसाचा व दुधाचा सौदा करा"* (यशया ५५:१); "जो माझ्याकडे येतो त्याला मी कधीच घालवून देणार नाही" (योहान ६:३७).

ख्रिस्तामध्ये देऊ करण्यात आलेल्या दयेत काय सौंदर्य आहे! देवाने स्वर्गातून खाली उतरून येऊन आपले नाव घेऊन आपण त्याच्याकडे येणार अशी हमी द्यावी याची काही गरज नव्हती; तरीही खुद्द त्याच्या पुत्राने अमर्याद दयेच्या भाषेत आपल्याला निमंत्रण दिले आहे, "अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या; म्हणजे मी तुम्हाला विसावा देईन" (मत्तय ११:२८).

दोन दैवी शब्द आहेत, ते म्हणजे: पश्चात्ताप आणि विश्वास. येशूच्या या भूतलावरील आरंभीच्या सेवाकाळात त्यांची नोंद आहे. "योहानाला अटक झाल्यानंतर येशू देवाची सुवार्ता गाजवीत, गाजवीत गालीलात आला व म्हणाला, काळाची पूर्णता झाली आहे व देवाचे राज्य जवळ आले आहे, पश्चात्ताप करा व सुवार्तेवर विश्वास ठेवा" (मार्क १:१४,१५). आपल्या पुनरुत्थानानंतर येशूने आपल्या शिष्यांस म्हटले, "यरुशलेमापासून आरंभ करून सर्व राष्ट्रांना त्याच्या नावाने पश्चात्ताप व पापक्षमा घोषित करण्यात यावी" (लूक २४:४७). प्रेषित पोलाने साक्ष दिली की "पश्चात्ताप करून देवाकडे वळणे व आपल्या प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणे ह्यासंबंधाने यहूदी व हेल्लेणी ह्यांस मी साक्ष देतो" (प्रे. कृ. २०:२१).

३. बायबलप्रमाणे ख्रिस्ती

बायबलप्रमाणे जो ख्रिस्ती आहे त्याने पापासाठी देवाने केलेली तरतूद प्राप्त करण्याकरता त्या संदर्भातील अटी पूर्ण अंत:करणाने मान्य केलेल्या असतात.

दैवी तरतूद प्राप्त करण्यासाठी दैवी अटी कोणत्या? आम्ही पश्चात्ताप केला पाहिजे आणि आम्ही विश्वास ठेवला पाहिजे. जरी या दोन संकल्पनांवर स्वतंत्रपणे चर्चा करायला हवी आहे, तरी आपण पश्चात्ताप विश्वासापासून वेगळा आहे किंवा विश्वास पश्चात्तापापासून वेगळा आहे असे समजू नये. खऱ्या विश्वासाचा पश्चात्तापाशी आणि खऱ्या पश्चात्तापाचा विश्वासाशी मिलाफ झालेला असतो. ते अशा प्रकारे परस्परांशी संयुक्त झालेले असतात की जेव्हा त्यांची देवाच्या तरतुदीशी झालेली खरी संयुक्तता तुम्ही पाहता तेव्हा तुम्हाला विश्वासणारा पश्चात्तापी व पश्चात्ताप पावलेला विश्वासी दिसतो.

अ.पश्चात्ताप

पश्चात्ताप म्हणजे काय? त्याची थोडक्यात कॅटकिझममध्ये सुरेख व्याख्या अशी आहे, "जीवनाबद्दल पश्चात्ताप होणे ही तारणदायी कृपा आहे. त्यामुळे पापी आपल्या पापाविषयीच्या खऱ्या जाणीवेने, आणि ख्रिस्तामधील देवाच्या कृपेने पकड घेतल्यामुळे, पापाविषयी द्वेष निर्माण होऊन व खेद वाटून पापापासून देवाकडे वळतो. आता प्रयत्नपूर्वक आज्ञापालन करणे हे त्याचे नवीन उद्दिष्ट बनते."

पश्चात्ताप म्हणजे दूर देशातील उधळ्या पुत्राने शुध्दीवर येणे होय. घरी आपल्या बापाच्या हुकमतीखाली राहण्याऐवजी, त्याने अकाली आपले वतन फार लवकर मागितले आणि घर सोडून दूर देशी निघून गेला व तिथे सर्व मालमत्ता उधळली. त्याच्या पापामुळे तो अगदी कंगाल झाला. ताळयावर येताच म्हणू लागला, "माझ्या बापाच्या किती तरी मोलकऱ्यांस भाकरीची रेलचेल आहे! आणि मी तर भुकेने इथे मरतो आहे. मी उठून आपल्या बापाकडे जाईन व त्यास म्हणेन, बाबा, मी स्वर्गाविरुद्ध व तुमच्या विरुद्ध पाप केले आहे; आता तुमचा मुलगा म्हणवून घेण्यास मी योग्य नाही. आपल्या एका मोलकऱ्याप्रमाणे मला ठेवा" (लूक १५:१७-१९).

जेव्हा उधळ्या पुत्राला आपल्या पापाची जाणीव झाली तेव्हा तो तेथेच विचार करत बसला नाही, त्यावर कविता लिहीत बसला नाही, की वडिलांना तातडीचा संदेश पाठवला नाही. तर वचन सांगते की "मग तो उठून आपल्या बापाकडे गेला" (लूक १५:२०). पापात असताना जे त्याचे मित्र होते, त्यांची संगत सोबत त्याने सोडली. त्या जीवनशैलीचे जे काही होते त्या सर्व गोष्टींचा त्याने तिटकारा केला व त्याकडे पाठ

केली. कोणती अशी गोष्ट होती की जी त्याला घराकडे घेऊन आली? ती म्हणजे विशाल अंत:करणाचा, आपल्या प्रेमळ व आनंदी कुटुंबावर न्यायाने हुकमत चालवणारा, त्याचा कृपाळू बाप तेथे आहे. त्याने असे पत्र लिहिले नाही की, "बाबा, येथे परिस्थिती बिकट होत चालली आहे, रात्रीची माझी शुद्ध हरपते. माझ्या मदतीसाठी थोडे पैसे पाठवाल का? नाहीतर एकदा येऊन मला भेटून जाल का, म्हणजे मला बरे वाटेल?" मुळीच नाही! फक्त मनाला बरे वाटावे अशी त्याची इच्छा नव्हती; तर त्याला बरे व्हायचे होते. म्हणून त्याने तो दूर देश सोडला.

प्रभूने गोष्टीत पुढचे चित्र सुंदर चितारले आहे. त्यात म्हटले आहे, "तो दूर आहे तोच त्याच्या बापाने त्याला पाहिले. त्याला त्याचा कळवळा आला आणि धावत जाऊन त्याच्या गळ्यात गळा घालून त्याने त्याचे मुके घेतले" (लूक १५:२०). उधळ्या पुत्र तोऱ्यात बापापुढे येऊन आपल्या घरी परत येण्याच्या निर्णयाबद्दल बोलत नाही.

हल्ली लोकांची एक कल्पना असते की पुढे वेदीसमोर जाऊन छोटीशी प्रार्थना केली की त्यात एक निर्णय घेतल्याने आपल्यावर देवाची मेहरबानी होते. खऱ्या परिवर्तनाशी याचा काही संबंध नाही. खऱ्या पश्चात्तापात मी स्वर्गीय देवाविरुध्द पाप केले आहे याची जाणीव असते — तो पिता महान, कृपाळू, पवित्र व प्रेमळ आहे — आणि त्याचा पुत्र म्हणवून घेण्याची माझी पात्रता नाही. मात्र जेव्हा माझे पाप सोडून द्यायला मी तयार होतो, त्याकडे पाठ करून वळतो, नम्रपणे त्याच्याकडे येतो, माझ्यावर दया होईल का याची माझ्या मनात विवंचना असते — तेव्हा कधी नव्हे असे आश्चर्य होते — पिताच मला भेटतो, समेटाने आपल्या दयामय व प्रीतीच्या हातांनी मला अलिंगन देतो. मी भावनिकतेने नव्हे तर सत्य सांगतो की, पश्चात्ताप करणाऱ्या पाप्याचे तारणाच्या प्रीतीने क्षमा करून तो सांत्वन करतो.

उधळ्या पुत्र डुकरांच्या खुराड्यात आणि वेश्यांच्या मिठीत असताना बापाने त्याला अलिंगन दिले नाही. ज्यांची अंत:करणे जगाशी जोडलेले असून जे जगरहाटीवर प्रेम करतात अशा काही लोकांविषयी मी बोलत नाही का? कदाचित तुमच्या वैयक्तिक जीवनात, किंवा तुमच्या आईवडिलांच्या नातेसंबंधात किंवा तुमच्या सामाजिक जीवनात जेव्हा तुमच्या दैहिक शुद्धतेविषयी तुम्ही गांभीर्याने पाहात नाही तेव्हा तुमचे खरे स्वरूप प्रकट होत असते.

तुमच्यापैकी कोणी जारकर्माच्या विळख्यात सापडले असतील, किंवा स्वत:चे अति चोचले पुरवत असतील किंवा टी व्ही वर वाईट प्रकारच्या काही गोष्टी पाहात असतील आणि चित्रपटातून आपल्या वासना तृप्त करत असतील पण तरीही तुम्ही स्वत:ला ख्रिस्तीच म्हणवत असाल. तुम्ही डुकराच्या खुराड्यात राहून रविवारी देवाच्या घरात जाऊन बसता. लाज वाटायला हवी तुम्हाला! तुमची डुकराची खुराडी आणि पापाचे अड्डे सोडा. तुमची चालचलणूक आणि दैहिक सवयी व देहाचे लाड पुरवणे सोडा! पश्चात्ताप म्हणजे इतके दु:ख वाटणे की पाप सोडून देणे. तुम्ही आपल्या पापाशी जोडलेलेच राहिला तर तुम्हाला देवाची क्षमा करणारी दया कदापि समजणार नाही.

ब. विश्वास

पश्चात्ताप म्हणजे जिवाने पापापासून फारकत घेणे. पण तो सतत विश्वासाला जडून राहाणार. विश्वास म्हणजे काय? ख्रिस्ताने शुभवर्तमानात देऊ केल्याप्रमाणे त्याच्याकडे आपला जीव सोपवून देणे. "जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांस म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्यांस त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला" (योहान १:१२). विश्वासाची तुलना ख्रिस्ताला पिण्याशी केली आहे कारण आपल्या जिवाची तहान शमवायला आपण त्याला पितो. विश्वासाची तुलना ख्रिस्ताकडे पाहण्याशी, त्याला अनुसरण्याशी आणि त्याच्याकडे धाव घेण्याशी केली आहे. बायबल यासाठी ज्या उपमा वापरते, त्यांची गोळाबेरीज केल्यास ती अशी होईल: गरजू पाप्यांसाठी ख्रिस्ताने जे काही होण्याचे अभिवचन दिले आहे, ते सर्व तो माझ्यासाठी होणार असा विश्वास धरून माझ्या गरजेच्या नग्नावस्थेत मी स्वत:ला माझ्या तारणाऱ्याच्या हाती सोपून देतो.

विश्वास ख्रिस्ताकडे काहीही आणत नाही, तर त्याच्याकडे रिक्त हाताने येतो, त्याद्वारे तो ख्रिस्त व त्याच्या ठायी जे आहे त्या सर्व गोष्टी स्वीकारतो. ख्रिस्तामध्ये काय आहे? माझ्या सर्व पापांसाठी पूर्णपणे क्षमा आहे! त्याचे परिपूर्ण आज्ञापालन माझ्या खात्यावर मांडले जाते. त्याचे मरण माझे मानले जाते. त्याच्या ठायी पवित्र आत्म्याचे दान आहे. दत्तकपण, (दत्तकपण ही देवाने मोफत दिलेली कृपा आहे, ज्यामुळे त्याच्या मुलांमध्ये आपली गणना होते, आणि देवाच्या सर्व मुलांना प्राप्त होणारे हक्क मिळण्याची संधी आपल्यालाही मिळते.) पवित्रीकरण,

(पवित्रीकरण हे पवित्र आत्म्याचे काम आहे. त्यामुळे आपले पूर्ण मानवत्व देवाच्या प्रतिमेत बदलते, व पापाला आपण अधिकाधिक मरू शकतो, व नीतिमत्वासाठी जगू लागतो — स्पर्जन्स कॅटॅकिझम, प्रश्न ३४.) आणि गौरवीकरण सर्व त्याच्यामध्ये आहे; आणि ख्रिस्ताला ग्रहण करण्याद्वारे जे सर्व त्याच्यामध्ये आहे ते सर्व विश्वास प्राप्त करतो." त्याच्याकडून तुम्ही ख्रिस्त येशूमध्ये आहा, तो देवापासून आपल्याला ज्ञान म्हणजे नीतिमत्व आणि पवित्रीकरण व खंडणी भरून प्राप्त केलेली मुक्ती असा झाला आहे" (१ करिंथ १:३०).

क. सतत एकत्र

बायबलप्रमाणे ख्रिस्ती म्हणजे काय? बायबलप्रमाणे ख्रिस्ती म्हणजे अशी व्यक्ती जी पापासाठी असलेली दैवी तरतूद प्राप्त करण्यासाठी अंत:करणपूर्वक दैवी अटी मान्य करते. त्या अटी म्हणजे पश्चात्ताप व विश्वास. त्यांच्याकडे पाहत असता तारणाच्या दरवाजाच्या या दोन बिजागऱ्या असल्याप्रमाणे पाहावे असे मला वाटते. बिजागरीला दोन पट्ट्या असतात, एक स्क्रूने दाराला जोडलेली असते तर दुसरी खांबाला स्क्रूने पिळलेली असते. त्या पिनेने परस्परांस एकत्र जोडलेल्या असतात, आणि दार सफाईदारपणे पुढेमागे होत राहाते. असे दार ख्रिस्त आहे, पण जो पश्चात्ताप करत नाही व विश्वास ठेवत नाही असा कोणीही त्या दाराने आत जाऊ शकत नाही.

फक्त पश्चात्तापाची बिजागरी असू शकत नाही. विश्वासाची जोड नसलेला पश्चात्ताप कायदेबद्ध असतो. शेवटी तो तुमच्यापर्यंत व तुमच्या पापांपर्यंतच संपतो. तसेच फक्त विश्वासाचीही खरी बिजागरी नसते. विश्वासाच्या कबुलीला जर पश्चात्तापाची जोड नसेल तर तो बनावट विश्वास असतो, कारण *पापात नव्हे* तर *पापापासून* माझे तारण होण्यासाठी मी ख्रिस्तावर खरा विश्वास ठेवलेला असतो. पश्चात्ताप व विश्वास आपण परस्परांपासून विभक्त करू शकत नाही. "तुम्ही पश्चात्ताप केला नाही तर तुम्हां सर्वांचा त्यांच्यासारखा नाश होईल" (लूक १३:३). अविश्वासीयांची नावे अशांमध्ये आहेत की ज्यांच्या "वाट्यास अग्नी व गंधकाचे सरोवर येईल; हेच ते दुसरे मरण आहे" (प्रकटी. २१:८).

४. बायबलप्रमाणे ख्रिस्ती असल्याचा पुरावा

बायबलप्रमाणे ख्रिस्ती असलेली व्यक्ती आपला पश्चात्ताप व विश्वास खरा असल्याचा दावा आपल्या जीवनातून व्यक्त करते.

पौलाने संदेश दिला की मनुष्यांनी पश्चात्ताप करून देवाकडे वळावे आणि पश्चात्तापास शोभतील अशी फळे द्यावीत (प्रे. कृ. २६:२०). देव अशा कार्याची अपेक्षा करतो: "कारण तुमचे तारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारे झाले आहे. आणि हे तुमच्या हातून झाले नाही तर हे देवाचे दान आहे. कोणी आढ्यता बाळगू नये म्हणून कर्मे केल्याने हे झाले नाही. आपण चांगली कर्मे करावी म्हणून ख्रिस्त येशूमध्ये उत्पन्न केलेले असे आपण त्याच्या हातचे काम आहो; ती कर्मे आपण करावी म्हणून देवाने ती पूर्वी योजून ठेवली" (इफिस २:८-१०).

गलती ५ मध्ये पौल म्हणतो विश्वासाचे काम प्रीतीने होते. जेथे ख्रिस्तावर खरा विश्वास असेल तेथे ख्रिस्ताची नवीन प्रीती रोपली जाते. आणि जेथे ख्रिस्तावरील प्रीती असते तेथे ख्रिस्ताचे आज्ञापालन होते. "ज्याच्याजवळ माझ्या आज्ञा आहेत व त्या जो पाळतो तोच माझ्यावर प्रीती करणारा आहे — माझ्यावर कोणाचे प्रेम नसल्यास तो माझी वचने पाळत नाही" (योहान १४:२१,२५). आपण ख्रिस्तावर प्रीती करण्याने किंवा आज्ञापालनाने नव्हे तर ख्रिस्तावर विश्वास ठेवण्याने तारण पावले आहोत; मात्र जो विश्वास प्रीती व आज्ञापालन उत्पन्न करू शकत नाही तो खरा तारणदायी विश्वास नाही.

खरा विश्वास प्रीतीने कार्य करतो. त्या प्रीतीचे काम म्हणजे सुंदरशा चांदण्या रात्रीच्या प्रकाशात बसून ख्रिस्ती असणे किती चांगले आहे याविषयी कविता लिहिण्याची क्षमता नव्हे. खरा विश्वास तुम्हाला असे करायला लावतो की तुम्हाला आपल्या घरी परतून तुमच्या आईबापांचे आज्ञापालन करायला लावतो, किंवा तुमच्या पतिवर प्रेम करायला लावतो, किंवा आपल्या पत्नी व मुलांवर बायबल सांगते तशी प्रीती करायला लावतो, किंवा तुमच्या शाळेत अथवा कामाच्या ठिकाणी तुम्हाला पाहाणाऱ्यांपुढे सत्य व धार्मिकतेची बाजू घेऊन खंबीरपणे उभे राहायला उद्युक्त करतो.

खरा विश्वास तुम्हाला अशी इच्छा देतो की तुम्हाला मुर्खात किंवा वेड्यात गणले किंवा कालबाह्य समजले गेले तरी चालेल, कारण तुमचा विश्वास असतो की सार्वकालिक, न बदलणारी नैतिक मूल्ये व दर्जेदार नीतितत्त्वे आहेत. मानवी जीवनाचे पवित्रीकरण व शिस्त यावर तुमचा विश्वास असतो. विवाहबाह्य लैंगिक संबंध व जन्म होण्यापूर्वीच गर्भपात करून बालके मारण्याविरुद्ध तुम्ही ठाम उभे राहता. कारण येशूने म्हटले आहे,

"या व्यभिचारी व पापी पिढीमध्ये जो कोणी माझी व माझ्या वचनांची लाज धरील, त्याची लाज मनुष्याचा पुत्र पवित्र देवदुतांसहित आपल्या पित्याच्या गौरवाने येईल तेव्हा तोही धरील" (मार्क ८:३८).

बायबलनुसार ख्रिस्ती म्हणजे काय? तो केवळ एवढेच म्हणत नाही की, "अरे हो, मला ठाऊक आहे की मी पापी आहे, माझ्या नोंदी वाईट आहेत आणि माझे ऱ्हदयही वाईट आहे. पाप्यासाठी देवाने केलेली तरतूद ख्रिस्तामध्ये आणि त्याच्या वधस्तंभामध्ये आहे हे देखील मी जाणतो. ती सर्वांसाठी व मोफत देऊ केलेली आहे. जे सर्व पश्चात्ताप करतात व विश्वास ठेवतात अशांना ती प्राप्त होते हे देखील मी जाणतो." पण एवढेच पुरेसे नाही.

तुम्ही पश्चात्ताप करून विश्वास ठेवता का? आणि जर तुम्ही पश्चात्ताप करून विश्वास ठेवल्याचे जाहीर करता तर, तुमच्या या निर्धाराशी तुम्ही दृढ आहात का? परिपूर्णतेचे नव्हे तर हेतुपुरस्सर तुम्ही येशू ख्रिस्ताचे आज्ञापालन करणारे जीवन जगता का?

"मला प्रभुजी, प्रभुजी, असे म्हणणाऱ्या प्रत्येकाचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यात होईल असे नाही; तर जो माझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेप्रमाणे वर्ततो त्याचा होईल" (मत्तय ७:२१). इब्री ५:९ मध्ये आपण वाचतो, "आणि सिद्ध होऊन तो आपल्या आज्ञेत राहाणाऱ्या सर्वांचा तारणकर्ता झाला." १ योहान २:४ मध्ये म्हटले आहे, "मला त्याचे ज्ञान आहे असे म्हणून जो त्याच्या आज्ञा जो मानीत नाही तो लबाड आहे, त्याच्या ठायी सत्य नाही."

बायबलला दृढ धरून असलेला मी ख्रिस्ती आहे असा विश्वास तुम्ही धरता का? तुमच्या जीवनातून पश्चात्ताप व विश्वासाची फळे दिसतात का? तुमचे जीवन ख्रिस्ताला जडलेले, ख्रिस्ताची आज्ञा पाळणारे, ख्रिस्ताला जाहीर प्रकट करणारे आहे का? तुम्ही ख्रिस्ताच्या मार्गावर निष्ठा ठेवणारे आहात हे तुमच्या जीवनाचे लक्षण आहे का? परिपूर्णतेने नाही - नाही. जशी मी आपल्या अपराध्यांची क्षमा करतो तशी तू माझ्या अपराधांची क्षमा कर अशी तुम्ही रोज प्रार्थना केली पाहिजे (मत्तय ६:१२). पण त्याच वेळी तुम्ही हे देखील म्हणायला हवे की "जगणे हे मला ख्रिस्त" आहे (फिलिपै १:२१). किंवा गीताच्या बोलात म्हणायचे तर:

घेतो माझा क्रूस येशू मी
त्यागी सर्व तुजमागे

खरा ख्रिस्ती येशूला अनुसरतो. आपल्यापैकी किती जण बायबलप्रमाणे खरे ख्रिस्ती आहेत? याचे उत्तर तुमच्या बुद्धीच्या व अंत:करणाच्या खोल कोठडीतूनच तुम्ही द्या. पण लक्षात ठेवा असे उत्तर की त्या उत्तराप्रमाणेच सार्वकालिक जीवनासाठी जगण्यास तुम्ही तयार असाल. कोणत्याही उत्तरात समाधान मानू नका तर ज्या उत्तराने तुम्ही मरणात व न्यायाच्या दिवशी सुरक्षित असाल ज्याविषयी तुमच्या मनाला समाधान वाटेल असेच उत्तर द्या.

प्रश्न
वैयक्तिक मननासाठी व गटचर्चेसाठी

तुम्हाला प्राप्त झालेले ज्ञान व लागुकरणास बळकटी येईल अशा प्रकारे खालील प्रश्नांची रचना केली आहे.

या पुस्तकातील सर्व मुद्द्यावर मार्गदर्शनासाठी निराळी अभ्यासपुस्तिका उपलब्ध आहे (only in English). तुम्ही पत्रद्वारा, स्वतंत्रपणे वैयक्तिक किंवा गटातही अभ्यास करू शकता. त्यासाठी वेब साईट आहे school@mountzion.org.

वैयक्तिक पाप (१)
१. जगातील सर्व धर्मांपेक्षा ख्रिस्ती विश्वास कसा भिन्न आहे?
२. अ. "वाईट नोंदी म्हणजे काय?
   ब. सर्व मानवांनी केव्हा पाप केले?
३. अ. "वाईट अंत:करण" म्हणजे काय?
   ब. वाईट अंत:करणाच्या काही लक्षणांचे वर्णन करा.
४. खालीलपैकी प्रत्येक वचनाचा मुख्य मुद्दा काय आहे?
   अ. रोम. ५:१२
   ब. यिर्मया १७:९
   क. मार्क ७:२१
   ड. रोम. ८:७

पापावर दैवी उपाय (२)
५. देवाने पापावर केलेला उपाय व्यक्तीत कसा एकत्रित केला आहे?
६. वधस्तंभावर आत्मिक दृष्ट्या काय घडले?
७. खालील प्रत्येक वचनात प्रमुख मुद्दा काय आहे?
   अ. योहान ३:१६
   ब. योहान १४:६
   क. योहान १:२९
   ड. यशया ५५:१
   ई. मार्क १:१४,१५
   फ. प्रे. कृ. २०:२१

बायबलप्रमाणे ख्रिस्ती (३)

८. अ. पश्चात्ताप म्हणजे काय?

ब. उधळ्या पुत्र कशा प्रकारे पश्चात्तापाचे उदाहरण आहे?

क. आधुनिक जगात डुकराच्या खुराड्याची उपमा देता येईल अशी कोणती स्थाने आहेत?

९. अ. विश्वास म्हणजे काय?

ब. विश्वास ख्रिस्ताचा कसा स्वीकार करतो?

१०. पश्चात्ताप व विश्वास कसे एकत्र जडलेले आहेत?

बायबलप्रमाणे ख्रिस्ती असण्याचे पुरावे (४)

११. विश्वास, प्रीती व आज्ञापालन यामधील परस्परसंबंधांचे वर्णन करा.

१२. खालीलपैकी प्रत्येक वचनाचा मुख्य मुद्दा काय आहे?

अ. प्रे. कृ. २६:२०

ब. इफिस २:८-१०

क. मत्तय ७:२१

बायबलप्रमाणे ख्रिस्ती म्हणजे काय?

लेखक: ॲल्बर्ट एन मार्टिन

अनुवाद: क्रॉसी उर्टेकर

बायबलप्रमाणे ख्रिस्ती म्हणजे काय? वाचकाच्या आत्मिक अवस्थेविषयी ही एक बोचक चौकशी आहे. लेखक विचारतो: देवाच्या वचनानुसार एकादा पुरुष, स्त्री, मुलगा किंवा मुलगी यांना ख्रिस्ती म्हणवून घेण्याचा अधिकार केव्हा प्राप्त होतो? कोणाही व्यक्तीने आपण ख्रिस्ती आहोत असा अंदाज करून गाफील राहू नये. या मुद्यावर चुकीचा निष्कर्ष काढल्यास तो खेदजनक किंवा प्राणघातक ठरेल. म्हणून बायबलप्रमाणे ख्रिस्ती कोण? या प्रश्नाचे बायबल जे उत्तर देते त्याची चार सूत्रे मी आपणापुढे मांडू इच्छितो.

अल्बर्ट एन् मार्टिन यांनी मॉन्टव्हिल येथील ट्रिनिटी बॅप्टिस्ट चर्चमध्ये १९६२-२००८ पर्यंत ४६ वर्षे पाळकीय सेवा केली. देवाच्या वचनाचा सखोल व सामर्थ्यानिशी उलगडा करण्याबद्दल त्यांच्या सेवेची ख्याती आहे. सध्या आपल्या मिशिगन येथील घरातून ते लिखाणाद्वारे व शिबिरांमधून शिकवण्याद्वारे सेवा करीत आहेत.

गेल्या शतकापासून जगभर ख्रिस्तकेंद्रित
ख्रिस्ती साहित्य रवाना करीत आहे.

CHAPEL LIBRARY

www.ChapelLibrary.org

C/O **लव्ह महाराष्ट्र,** १७७२ भीमपुरा गल्ली, क्र. २३, बाबाजान चौक,
पुणे - ४११००१. महाराष्ट्र

दुरध्वनी: ०२०-२६३४०५५३

ईमेल: lovemaharashtra@gmail.com
वेबसाईट: www.lovemaharashtra.org